आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२८ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आणखी एकच दिवस उरल्यानं उमेदवारांची लगबग, मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्र्यासह अनेकांची नामांकनं दाखल

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून आणखी २५ उमेदवारांची, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ७ उमेदवारांची यादी जाहीर

- काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री अनिस अहमद यांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश, नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर

- सार्वजनिक जीवनातली सचोटी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाला चालना देण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता सप्ताह

**आणि**

- शेअर बाजार पुन्हा तेजीत /सेन्सेक्समधे ६०३ अंकांची, तर निफ्टीत १५८ अंकांची वाढ

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज विविध उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात भव्य रॅली काढली आणि कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेना नेते प्रताप सरनाईक आणि इतर यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बारामती मतदारसंघातून आज नामनिर्देशनपत्र दाखल केलं. बारामतीतून महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांनीही अर्ज

दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यावेळी उपस्थित होते. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी मतदारसंघातून अर्ज भरला. नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले प्रताप चिखलीकर यांनीही आज लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. खासदार नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे यांनी कुडाळमधून उमेदवारी अर्ज भरला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माहीमचे उमेदवार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनीही अर्ज दाखल केला. जोगेश्वरी विधानसभेसाठी शिवसेनेच्या उमेदवार मनिषा वायकर यांनी अर्ज दाखल केला.

**नवी मुंबईत**ल्या ऐरोली विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे विद्यमान आमदार गणेश नाईक यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून तर बेलापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संदीप नाईक यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार गजानन काळे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला.

**रत्नागिरी** जिल्ह्यात चिपळूण विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शेखर निकम यांनी, तर रत्नागिरीतून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुरेंद्रनाथ यशवंत उर्फ बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**कुडाळ** विधानसभा मतदार संघातून निलेश राणे यांनी शिवसेनेकडून, तर **कणकवलीतून** आमदार नितेश राणे यांनी भाजपाकडून अर्ज भरला. **सावंतवाडी** विधानसभा मतदार संघातून भाजपाचे युवानेते विशाल परब यांनी अपक्ष अर्ज भरला. राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अर्जुनी मोरगावमधून माजी मंत्री राजकुमार बडोले

यांनी, तर तिरोड्यातून विजय राहागडाले यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

**सांगली** जिल्ह्यात पलूस- कडेगाव विधानसभा मतदारसंघात आमदार विश्वजीत कदम यांनी काँग्रेसकडून, तर जत विधानसभा मतदारसंघात भाजपातर्फे आमदार गोपीचंद पडळकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. शिराळा विधानसभा मतदारसंघात भाजपाचे सत्यजित देशमुख, तर खानापूर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे वैभव पाटील यांनी अर्ज दाखल केला.

**अहिल्यानगर** जिल्ह्यात महाविकास आघाडीतर्फे राहुरी विधानसभा मतदारसंघातून प्राजक्त तनपुरे, कर्जत जामखेड मतदार संघातून रोहित पवार तर शिर्डीतून प्रभावती घोगरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अकोले विधानसभा मतदारसंघांतून माजी आमदार वैभव मधुकर पिचड यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला.

**धुळे** ग्रामीण मतदारसंघासाठी काँग्रेसचे कुणाल पाटील यांनी, तसंच बाजीराव हिरामण पाटील, यशवंत खैरनार, गुलाबराव कोतेकर यांनी देखील अर्ज दाखल केले. बहुजन समाज पार्टीचे उमेदवार आनंद सैंदाणे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला. तर धुळे शहर विधानसभेसाठी समाजवादी पार्टीचे उमेदवार इर्शाद जहागिरदार, वंचित बहुजन आघाडीचे जितेंद्र शिरसाठ, तसंच अपक्ष प्रभादेवी परदेशी यांनी अर्ज दाखल केले. शिरपूर विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे काशिराम पावरा, साक्रीतून भाजपाचे पंचायत समिती सदस्य विजय ठाकरे यांनी, तर भाजपाचे मोहन सूर्यवंशी यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. **जालना** मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डेव्हीड घुमारे यांनी अर्ज दाखल केला.

**वाशिम** मतदारसंघात आज रिपाईचे राजरत्न आंबेडकर, तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डॉ. सिद्धार्थ देवळे यांच्यासह १३ जणांनी अर्ज दाखल केले. **गडचिरोली** विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार डॉ. मिलिंद नरोटे यांनी अर्ज दाखल केला. **भंडारा** जिल्ह्यात पवनी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नरेंद्र पहाडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

दरम्यान, औरंगाबाद मध्य विधान सभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार किशनचंद तनवाणी यांनी निवडणूकीतून माघार घेतली आहे. आपल्या मतदार संघात २०१४ च्या निकालाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आपण माघार घेत असून, पक्ष जो उमेदवार देईल, त्याच्या पाठिशी भक्कमपणे उभं राहू, असं तनवाणी यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. वर्सोव्यातून भारती लव्हेकर, घाटकोपर पूर्वमधून पराग शाह, माळशिरसमधून राम सातपुते, आष्टीतून सुरेश धस, सावनेरमधून आशिष देशमुख यांच्यासह इतरांची नावं यात आहेत. बोरीवलीतून संजय उपाध्याय, कारंज्यातून सई डहाके, वसईतून स्नेहा दुबे, लातूरमधून अर्चना पाटील- चाकूरकर यांना उमेदवारी मिळाली आहे. भाजपानं आतापर्यंत १४६ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपानं संतुक हंबर्डे यांचं नाव जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं विधानसभा निवडणुकीसाठी ७ उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे.

<><><><><>

काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री आमदार अनिस अहमद यांनी आज वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत मुंबईत राजगृह इथं हा पक्ष प्रवेश झाला. अनिस अहमद यांना वंचित बहुजन आघाडीनं नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

सार्वजनिक जीवनातली सचोटी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाला चालना देण्यासाठी आजपासून देशभरात दक्षता सप्ताह पाळण्यात येत आहे. राष्ट्राच्या भरभराटीसाठी एकात्मतेची संस्कृती विकसित करणं ही या सप्ताहाची संकल्पना आहे. सुशासन तसंच प्रशासनात नैतिकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी अधिक संवेदनशीलतेची गरज लक्षात घेऊन हा  सप्ताह आयोजित केला आहे. विविध मंत्रालयं, विविध सरकारी विभाग, सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्या, बँका आणि इतर संस्थामधले सरकारी अधिकाऱ्यांनी आज शपथ घेतली. तसंच

भ्रष्टाचारविरोधात जागृतीसाठी आठवडाभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. दरवर्षी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या आठवड्यात हा सप्ताह आयोजित केला जातो.

केंद्रीय दक्षता आयोगाचे आयुक्त प्रवीण कुमार श्रीवास्तव आणि दक्षता आयुक्त ए एस राजीव यांनी आयोगाच्या नवी दिल्लीतल्या मुख्यालयात अधिकाऱ्यांना तर आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पलिवाल गौर यांनी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन इथं अधिकाऱ्यांना शपथ दिली.

**<><><><><>**

पाच दिवसांच्या मंदीनंतर आज देशातला शेअर बाजार तेजीत बंद झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ६०३ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ५ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १५८ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ३३९ अंकांवर बंद झाला. बँक, वस्तू, दूरसंवाद, आरोग्य क्षेत्रातल्या कंपन्यांना या तेजीचा फायदा झाला.

**<><><><><>**

देशभरात दीपावलीच्या मंगलपर्वाला आज, गोवत्स द्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून प्रारंभ झाला. आज, गायवासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. येत्या रविवारपर्यंत चालणाऱ्या या प्रकाशोत्सवानिमित्त महाराष्ट्रात सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. मनोवेधक रोषणाईनं बाजारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या या बरोबरच कपडे, दागिने खरेदीसाठी लगबग दिसून येत आहे.

**<><><><><>**

कोकणात तुरळक ठिकाणी काल पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली. राज्यात इतरत्र

सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//